# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.06.2025** **वारःबुधवार**

1. शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाला राज्य मंत्रीमंडळाची मंजुरी
2. राज्यात एक हजार 71 मेगावॅट क्षमतेचे सौरउर्जा प्रकल्प उभारणार असल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
3. राज्य शासनाचे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार जाहीर
4. देशभरात आज संविधान हत्या दिन पाळण्यात येणार आणि,
5. अँडरसन-तेंडुलकर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना भारतानं गमावला

**निर्णय-शक्तीपीठ-महामार्ग**

वर्धा जिल्ह्यातील पवनार, ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रादेवी या महाराष्ट्र-गोवा द्रुतगती महामार्गाला राज्य मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. राज्यातील साडेतीन शक्तिपीठं, दोन ज्योतिर्लिंगं आणि पंढरपूर अंबेजोगाई सहित 18 तीर्थक्षेत्रांना जोडणारा हा शक्तिपीठ महामार्ग प्रकल्प महामंडळामार्फत राबवण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या आखणीसाठी तसंच भूसंपादनासाठी 20 हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे.

आदिवासी शासकीय वसतीगृहांमधल्या विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता तसंच आहार भत्त्यात वाढ करायचा निर्णयही घेण्यात आला आहे. 2017 च्या महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियमात सुधारणा करून, आगामी अधिवेशनात नवं विधेयक आणण्याचा निर्णयदेखील या बैठकीत झाला. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांसाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीतील तडजोडीसाठी सुधारणा विधेयक आणण्याचा निर्णयही झाला. पिंपरी - चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील चिखली इथल्या 'दफनभूमी' च्या क्षेत्रापैकी 40% क्षेत्र मैला शुध्दीकरण केंद्रासाठी वापरण्यासही मंजुरी देण्यात आली.

**सौरऊर्जा**

राज्यात शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी महानिर्मितीतर्फे एक हजार 71 मेगावॅट क्षमतेचे सौरउर्जा प्रकल्प 'मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प 2.0' अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केली. या प्रकल्पांमुळे राज्यातल्या तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. तसंच या प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत.

**अंदाज समिती-मुंबई**

केंद्र आणि राज्य सरकारकडून कल्याणकारी योजनांवर होणारा खर्च वाढत असल्यानं संसद आणि विधिमंडळाच्या अंदाज समित्यांची जबाबदारी वाढली आहे. या समित्यांनी अधिक कार्यक्षमतेनं जबाबदारीचं पालन करावं असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल मुंबईत केलं. विधानभवनात संसदेच्या अंदाज समितीच्या अमृतमहोत्सवानिमित्त राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं; या परिषदेच्या समारोप समारंभात ते बोलत होते. संसदीय समित्या सरकारच्या विरोधी नव्हे तर पूरक काम करतात. त्यांच्या अहवालाकडे पाहताना सरकारनं हाच दृष्टिकोन ठेवावा आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या समित्यांचे अहवाल योग्य रितीनं अंमलात आणावेत अशी सूचना लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी यावेळी केली. राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**राम मोहन नायडू**

हेलिकॉप्टर आणि लहान विमानांची मागणी वाढल्यानं त्यांच्या उत्पादनाला चांगला वाव आहे; असं केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री के राममोहन नायडू यांनी काल पुण्यात सांगितलं. सध्या देशात 162 विमानतळं असून 2047 पर्यंत देशातील विमानतळांची संख्या साडेतीनशे पर्यंत जाईल; त्यामुळे विमानं आणि हेलिकॉप्टर्सची संख्याही वाढणार असल्याचं नायडू म्हणाले. राज्य शासनानं फिक्कीच्या सहकार्यानं आयोजित केलेल्या एका परिषदेत ते बोलत होते. हेलिकॉप्टर आणि लहान विमान निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी आणि उद्योजक यात सहभागी झाले होते.

**आणीबाणी**

देशभरात आज संविधान हत्या दिवस पाळण्यात येत आहे. 25 जून 1975 रोजी देशात आणीबाणी लागू करण्यात आली; भारतीय संविधान पायदळी तुडवण्यात आलं; या दिवसाचं स्मरण करण्यासाठी तसंच आणीबाणीच्या काळात हालअपेष्टा भोगलेल्या नागरिकांच्या योगदानाचं स्मरण करण्यासाठी त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आजचा दिवस पाळला जातो. ऐकुया याबाबत एक वृतान्त सहकारी संध्या खान यांच्याकडून....

**आणीबाणीच्या काळात, नागरिकांच्या स्वातंत्र्यावर अंकुश लावण्यात आले. केंद्र सरकारनं वृत्तपात्रांवर कडक निर्बंध लागू करत वृत्तपत्रांची गळचेपी केली, वृत्तपत्रांचे छापखाने बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या; पत्रकारांवर कर लादले गेले, त्यांना तुरुंगात टाकण्यात आलं. जयप्रकाश नारायण, लालकृष्ण अडवाणी, अटलबिहारी वाजपेयी, मोरारजी देसाई, मधु दंडवते यांच्यासह अनेक विरोधी नेत्यांना अटक करण्यात आली. आणीबाणीच्या काळात गुजरातमधील नवनिर्माण आंदोलन, बिहारमधील जयप्रकाश नारायण यांचं आंदोलन, जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखालील रेल्वे संप अशा अनेक राजकीय चळवळी आणि आंदोलनंही झाली. अंतर्गत सुरक्षेसंदर्भात मीसा कायद्याचा दुरुपयोग करत अनेक नागरिकांना; त्यांच्यावर कुठलेही आरोप नसताना ताब्यात घेतलं जात होतं; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून आणीबाणीच्या घटनेबाबत टीका करत या घटनेचा निषेध केला. आणीबाणीची घोषणा हा भारतीय लोकशाहीवरील काळा डाग असल्याचं पंतप्रधानांनी आपल्या भाषणात म्हटलं आहे.**

**पत्रकार-पुरस्कार**

पत्रकारितेच्या क्षेत्रातल्या उत्कृष्ट कार्यासाठी राज्य शासनाच्या वतीने दिले जाणारे 2021 ते 2023 या तीन वर्षांसाठीचे पुरस्कार जाहीर झाले आहेत. राही भिडे, सुधीर पाठक, भाऊ तोरसेकर, विजय बाविस्कर आणि बाळासाहेब जाधव या पाच ज्येष्ठ पत्रकारांना लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. एक लाख रुपये, मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. 2021 या वर्षासाठीचा अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार मंगेश वैशंपायन यांना जाहीर झाला आहे.

**संतोष देशमुख-बीड**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी काल झालेल्या सुनावणीत, वाल्मिक कराडचा संतोष देशमुख यांचा या हत्येत सहभाग नाही, असा युक्तीवाद त्याच्या वकिलाने न्यायालयात केला. विशेष सरकारी वकिल उज्ज्वल निकम यांनी या युक्तिवादाला विरोध केला. न्यायालयानं दोन्ही बाजूंचे युक्तीवाद ऐकले, याप्रकरणी पुढील सुनावणी 7 जुलै रोजी होणार आहे.

**पनवेल-विमानतळ**

मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल इथल्या लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला वेग आला आहे. इंटर टर्मिनल कनेक्टिव्हिटी असणारा भारतातील हा पहिलाच विमानतळ असणार आहे. वार्षिक दोन कोटी प्रवासी क्षमता असलेलं टर्मिनल 1 सप्टेंबर 2025 पासून सुरु होईल. पहिल्या टप्प्यात आंतरराज्यीय विमानसेवा प्राथमिक स्तरावर सुरु

होईल, तर 2029 पर्यंत जवळजवळ 80 टक्के काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, अशी माहिती खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली आहे.

**रुग्णवाहिका-आंदोलन-भंडारा**

रुग्णवाहिका चालकांचं थकीत मानधन देण्याच्या तसंच त्यांना राज्य शासनाच्या नोकरीत सामावून घेण्याच्या मागणीसाठी भंडारा जिल्ह्यातील रुग्णवाहिका चालकांनी काम बंद आंदोलन सुरू केलं आहे. या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा या आंदोलकांनी दिला आहे.

**निधन-मुंबई**

भारताचे माजी फिरकी गोलंदाज दिलीप दोशी यांचं सोमवारी रात्री लंडनमध्ये हृदयविकारानं निधन झालं. ते 77 वर्षांचे होते. उत्कृष्ट फिरकी गोलंदाज आणि यशस्वी हिंदी क्रिकेट समालोचक म्हणून ते लोकप्रिय होते. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आठशे अठ्ठ्याण्णव बळी घेणाऱ्या दिलीप दोशी यांनी 238 प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये 43 वेळा 5 बळी घेतले. एका सामन्यात दहा बळी घेण्याचा विक्रम त्यांनी सहा वेळा केला होता.

**क्रिकेट**

अँडरसन-तेंडुलकर चषकाच्या हेडिंग्ले इथं झालेल्या पहिल्या क्रिकेट कसोटीमध्ये इंग्लंडनं भारतावर 5 गडी राखून विजय मिळवला आहे. कालच्या पाचव्या दिवशी इंग्लंडनं बेन डकेटच्या 149 तसच झॅक क्रॉली आणि ज्यो रूट यांच्या अर्धशतकाच्या जोरावर 371 धावांचं आव्हान सहज पार केलं. दुसरी कसोटी 2 जुलै पासून बर्मिंगहॅम इथं सुरू होणार आहे.

**पाऊस**

कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या दोन दिवसात पावसाचा जोर वाढला आहे. पंचगंगा नदीचं पाणी यंदा पहिल्यांदाच पात्राबाहेर गेलं आहे. कोल्हापूर जिल्ह्यातले 37 बंधारे सध्या पाण्याखाली गेले आहेत. राधानगरी धरण 63 टक्के भरलं असून, धरणातून पाण्याचा विसर्ग सध्या भोगावती नदीपात्रात सुरू आहे. जिल्ह्यातले अनेक लघु पाटबंधारे प्रकल्प 100 टक्के भरले आहेत.

सिंधुदुर्ग जिल्हयातही पावसाचा जोर वाढला आहे. समुद्र खवळला असल्यामुळे मच्छिमार बांधवानी आणि नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. कुडाळ तालुक्यात वसोली गावात सोमवारी रात्री पुलावरून जाणारे दोन दुचाकीस्वार नदीच्या पाण्यात वाहून गेले. त्यापैकी एकजण वाचला असून दुसऱ्याचा शोध सुरु आहे.

रत्नागिरीत सध्या पावसाची संततधार नसली, तरी कालपासून अधून मधून वादळी वाऱ्यांसह जोरदार सरी कोसळत आहेत. साताऱ्यातील कण्हेर आणि उरमोडी धरणाच्या क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू आहे. नाशिक शहरात मात्र पावसाचा जोर ओसरला आहे.

**हवामान**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून किनारपट्टी जवळील भागात सोसाट्याचे वारे वाहण्याचा अंदाज आहे, तर मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजांसह पाऊस आणि सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**